## नि.दि.दा.क्र.३५/२०२१ मधील निशाणी क्रमांक ५ खालील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा दावा वाटपासाठी, ठरावासाठी व मनाईसाठी दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादी क्र. ३ यांनी दावा मिळकत जप्त करुन लिलाव करु नये असा प्रतिवादी क्र. ३ विरुध्द तुर्तातुर्त मनाईचा हुकुम व्हावा अशी विनंती उक्त अर्जान्वये केली आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन** –

**०३.** तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका भार, मा. दुय्यम निबंधक साहेब भार आणि भोर, नगर परिषद, भोर यांचे अखत्यारीतील मौजे भोर येथील मिळकत.

| अ.क्रं. | गट नंबर | क्षेत्र<br>हे. आर. | आकार<br>रु. पैसे |
|---|---|---|---|
| अ. | भु मापन क्र./सर्वे क्र. १८५/१/अ/१० | क्षेत्र ०० हे. ०२ आर यापैकी ०० हे ०१ आर व त्यावरील भोर म्युनिसिपल घर मिळकत क्र. २१२९ क्षेत्र ६१.१० चौ.मी. | ०० रु ०७ पैसे |

सदर मिळकतीच्या चतु:सिमा खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | – | याच गटातील धोंडीराम तुकाराम पेटकर यांचे क्षेत्र व लागून रस्ता. |
| दक्षिणेस | – | श्री. किसन दगडू भोर यांची मिळकत. |
| पश्चिमेस | – | श्री. किसन दगडू भोर यांची मिळकत. (डॉ. गोरेगावकर दवाखाना) |
| उत्तरेस | – | श्री. कट्टे व किंद्रे यांची मिळकत. |

(यापुढे सदर मिळकतीस 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येत आहे.)

**<u>अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>** –

**०४.** दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. २ यांचे वडील व प्रतिवादी क्र. १ चे पती रविंद्र दत्तात्रय सावंत यांचे खरेदी मालकीची आहे. रविंद्र दत्तात्रय सावंत व धोंडीराम तुकाराम पेटकर यांनी सर्वे नं. १८५/१/अ/१० क्षेत्र ०० हे. ०१ आर क्षेत्र धोंडीराम तुकाराम पेटकर यांचेकडे आहे व सदर ०० हे ०२ आर मुळ खरेदी मिळकतीचे उत्तर बाजुने पुर्वेकडील रस्त्यापासून वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांना जाण्या येण्याच्या वहिवाटीसाठी बोळ ठेवला आहे. अशा प्रकारे दावा मिळकतीत वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांचेशिवाय अन्य कोणाचाही मालकी हक्क वहिवाट व हितसंबंध नाही.

**०५.** वादीचे पुढे असे कथन आहे की, वादी, प्रतिवादी क्र. १ व २ यांचे

एकत्र हिन्दु कुटूंब असून त्यांच्या पैकी वादी क्र. २ चे लग्न झाले असून ती तीचे सासरी राहत आहे. वादी व प्रतिवादी क्र. चे वडील व व प्रतिवादी क्र. १ चे पती रविंद्र दत्तात्रय सावंत हे मयत असून त्यांना वादी व प्रतिवादी क्र. १ व २ हे कायदेशीर वारस आहेत. दावा मिळकतीमधील भोर म्युनिसिपल घर मिळकत क्र. २१२९ ही मयत रविंद्र दत्तात्रय सावंत यांचे नावे म्युनिसिपल रेकॉडला नमुद आहे.

**०६.** वादीचे पुढे असे कथन आहे की, सदर दावा मिळकतीचे वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांच्यात आज अखेरपर्यंत केव्हाही सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. वादी क्र. १ व २ तसेच प्रतिवादी क्र १ हया एकत्रात राहत आहे परंतु आपसात पटत नसल्याने वादींनी प्रतिवादी क्र. १ याच्याकडे त्यांच्या असलेल्या हिश्श्याचे वाटप करुन मागितले. त्यास प्रतिवादी क्र. १ ने नकार दिला म्हणून वादींनी प्रतिवादी क्र. १ व २ विरुध्द सदरचा वाटपाचा दावा दाखल केला आहे.

**०७.** वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. २ हा परागदा असून तो दि. ११/०१/२०१७ रोजी राहते घरातून निघून गेला आहे. त्याबाबतची मिसिंग केस दि. १३/०५/२०१७ रोजी भोर पोलीस स्टेशनला नोंदवली. सदर

बाब प्रतिवादी क्र. ४ संस्थेस होती. असे असताना वादी क्र. २ दिनांक ०९/०३/२०२१ रोजी घरी असताना प्रतिवादी क्र. ३ यांनी प्रतिवादी क्र. २ च्या नावे पाठवलेली नोटीस वादीक्र. २ यांना मिळाली. सदर नोटीस प्रतिवादी क्र. २ यांनी प्रतिवादी क्र. ४ संस्थेच्या घेतलेल्या कर्जाचे वसुलीबाबत असून दावा मिळकत जप्त करण्याबाबतची आहे असे वादींना प्रथमच समजले. सदर दावा मिळकत प्रतिवादी क्र. ४ संस्थेस गहाण, दान तारण ठेवलेली नव्हती याची माहिती वादीस मिळाली. सदर बाबतील प्रतिवादी क्र. १ यांना काहीही माहित नसल्याचे त्यांनी सांगितले. वादींनी प्रतिवादी क्र. १ यांना भेटून वादीचा कायदेशीर हिस्सा वाटपाने पृथक व तुटक करुन मागितला असता त्यास प्रतिवादी क्र. १ ने उडवाउडवीची उत्तरे दिली वा वाटप करुन देण्यास नाकारले.

०८. वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ४ यांनी प्रतिवादी क्र. २ यांना कर्ज देताना वादी अगर प्रतिवादी क्र. १ यांची संमती घेतली नाही अगर त्याबाबत वादी अगर प्रतिवादी क्र. १ यांना केव्हाही विचारणा केली नाही. इतकेच नाहीतर दावा मिळकत तारण ठेवलेली नसताना व दावा मिळकतीचे गहाणखत करुन घेतले नसताना व प्रतिवादी क्र. २ परागंदा असल्याचे प्रतिवादी क्र. ४ यांना माहिती असून त्यांनी कोर्टाची दिशाभूल करुन जप्ती कारवाई बाबत

मे. कोर्टाकडून खोटा दाखला मिळवला आहे व तो दाखला मिळवण्यापूर्वी वादी अगर प्रतिवादी क्र. १ यांना कोणत्याही प्रकारची नोटीस काढली नव्हती. तसे न करता मे. कोर्टाची दिशाभुल करुन एकतर्फा आदेश मिळवला आहे त्या आदेशाच्या आधारे प्रतिवादी क्र. ३ वादींच्या मालकीची दावा मिळकत जप्त करण्याचा बेकायदेशीर प्रयत्न करीत आहे.

**०९.** वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचे बेकायदेशीर कृत्यामुळे वादींना दावा मिळकतीतील त्याच्या हिश्श्यास मुकावे लागण्याची शक्यत निर्माण झाली आहे. प्रतिवादी क्र. ३ ने दावा मिळकत जप्त करुन लिलाव केल्यास वादींचे वास्तव्याची गैरसोय होणार असून वादीचे कधीही न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे व वादींना त्यांचया कायदेशीर हिश्यास मुकावे लागणार आहे. ते टाळण्यासाठी स्वतःच्या हिताच्या रक्षणासाठी वादीस सदरचा दावा प्रतिवादी विरुध्द वाटप, ठराव व मनाईसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे वादी यांनी दाव्याचा अंतीम निकाल लागेपर्यंत प्रवादी क्र. ३ यांनी दावा मिळकत जप्त करुन लिलाव क नये असा तुर्तातुर्त ताकिदीचा हुकूम प्रतिवादी क्र. ३ यांचे विरुध्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**१०.** प्रतिवादी क्रं १,२ व ३ यांचेविरुध्द दावा एकतर्फा चालवण्यात आला. प्रतिवादी क्र. ४ यांचेविरुध्द दावा विनाकैफियत तसेच नि.क्रं ५ चे मनाई अर्जास प्रतिवादी क्र. ४ यांनी म्हणणे दिलेले नसल्याने सदर नि.क्र. ५ चा मनाई अर्ज विना म्हणणे व विना युक्तीवाद करण्यात आला.

**११.** वादीतर्फे विधीज्ञ यांनी नि.५ वर दाखल अर्ज हाच नि. ५ चा युक्तीवाद समजण्यात यावा असे निवेदन केले. वादीचे कथन तसेच संचिकेत दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित होतात. सदर प्रश्नबिंदूचे निष्कर्ष कारणमिमांसेह खालील प्रमाणे –

| **अ.क्र.** | **प्रश्नबिंदू** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीचे हक्कात प्रथमदर्शनी केस आहे काय ? | होय |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे ? | होय |
| ३. | उक्त अर्ज नामंजूर केल्यास वादी चे अपरिमित नुकसान होईल ? | होय |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

**१२.** वादीतर्फे दावा मिळकतींच्या संदर्भात नि.क्रं. ३ सोबत दाखल केलेले कागद खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | कागदाचा तपशील | दिनांक | दाखल कागद |
|---|---|---|---|
| १. | मौजे भोर सर्वे नं. १८५/१/अ/१० चा ७/१२ उतारा | ०९/०३/२०२१ | डिजिटल प्रत |
| २. | भोर म्युनिसिपल घर मिळकत क्र. २१२९ चा कराची पावती | -- | मुळ |
| ३. | वसुली अधिकारी यांचे पत्र | ०४/०३/२०२१ | झेरॉक्स प्रत |
| ४. | मिसिंग केसचे भोर पोलीस स्टेशनचे सामान्य दैनिक विवरण | १३/०५/२०१७ | मुळ |
| ५. | रविंद्र दत्तात्रय सावंत यांचे मृत्युचा दाखला | १६/०९/२०१५ | झेरॉक्स प्रत |

## <u>का र ण मि मां सा</u>

### <u>प्रश्नबिंदू क्रं.१ ते ३ करीता–</u>

**१३.** वादी दावा मिळकती संदर्भाने प्रथमदर्शनी केस त्यांच्या बाजूने आहे असे सिध्द करतात का हे पाहणे महत्त्वाचे आहे. याचाच अर्थ वादीच्या न्यायिक हक्क अधिकारास प्रतिवादी अडथळा निर्माण करत आहेत का हे पाहणे महत्त्वाचे आहे.

**१४.** वादीने प्रस्तुतचा दावा वाटपासाठी, निरंतर मनाईसाठी, कब्जासाठी दाखल केला आहे. वादीचे असे कथन आहे की, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. २ यांचे वडील व प्रतिवादी क्र. १ यांचे पती यांचे रविंद्र दत्तात्रय सावंत व प्रतिवादी क्र. ५ यांनी एकत्रात खरेदी केली. ज्यात पूर्व बाजूस हिस्सा प्रतिवादी क्र. ५ चा व पश्चिम बाजूचा हिस्सा वादीच्या वडीलांच्या नावे आला. त्यावर दोघांनी आपआपली घरे राहण्यासाठी बांधली आहे. प्रतिवादी क्र. ५ दाव्याकामी हजर झाले. त्यांनी दाव्यासाठी दिलेल्या म्हणण्यात वादीचे हे कथन मान्य केले आहे.

**१५.** वादीचे पुढे असे कथन आहे की, वादीच्या वडीलांच्या पश्चात सदर दावा मिळकत वादी, प्रतिवादी क्र. १ व २ यांना वारस हक्काने मिळालेली आहे. ते दर्शविण्यासाठी वादीने नि.क्र. ३ यादी सोबत दावा मिळकतीचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. ज्यावर वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या नावाची सामाईक नोंद दिसते. तसेच घर मिळकत क्र. २१२९ चे कर भरल्याच्या पावती दाखल असून त्यामध्ये दावा मिळकतीमधील भोर म्युनिसिपल घर मिळकत क्र. २१२९ ही मयत रविंद्र दत्तात्रय सावंत यांचे नावे म्युनिसिपल रेकॉर्डला नमुद असल्याचे दिसते. वादीचे कथन आहे की, दावा मिळकतीत तिचा कायदेशीर हक्क आहे व वाटप होणे बाकी आहे. सदर कथनाला छेद देणारा कोणताही पुरावा समोर

आलेला नाही.

**१६.** वादीने नि. ५ ची मागणी केवळ प्रतिवादी क्र. ३ वसुली अधिकारी विरुध्द केली आहे. वादीचे कथन आहे की, प्रतिवादी ३ ने जप्ती व लिलावाची नोटीस दावा मिळकतीसंदर्भाने पाठवली ती गैर आहे. दावा मिळकत कधीही गहाण ठेवण्यात आलेली नाही. सबब कर्ज थकवण्याचा प्रश्न नाही कारण गहाण ठेवण्यासाठी वादी दावा मिळकतीत सहहिस्सेदार असल्याने त्यांची कोणतीही संमती घेण्यात आलेली नव्हती.

**१७.** प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र. ३ यांना दाव्याच्या समन्स नोटीस मिळूनही ते गैरहजर राहिले. वादीने केलेल्या कथनांना कोणतेही आव्हान प्राप्त झाले नाही. दावा मिळकतीचे ७/१२ उता–यावर वादीचे नाव दिसते. सबब वादीचा हिस्सेदारीने कब्जाही दिसतो. प्रथमदर्शनी दावा मिळकतीसंदर्भाने वादीचा हक्क असल्याचे व योग्य कागदपत्रे प्रतिवादी क्र. ३ दाखल करण्यास असमर्थ ठरल्याने वादीचा प्रथमदर्शनी हक्क संरक्षीत करणे गरजेचे आहे. सबब, न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने आहे. अपरिमित नुकसान प्रतिवादी क्र. ३ च्या तुलनेत वादीचे होणार आहे. त्यामुळे वादीला अंतरीम संरक्षण देणे न्यायोचित ठरणार आहे. सबब, मुद्दा क्र. १ ते ३ होकारार्थी नोंदवण्यात येतो.

**<u>प्रश्नबिंदू ४ करीता</u> –**

**१८.** प्रश्नबिंदू क्रं. १ ते ३ चे उत्तर वादीच्या हक्कात आल्याने प्रश्नबिंदू ४ करिता पुढील आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात आला.

२. प्रतिवादी क्र. ३ यांनी दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत दावा मिळत जप्त करुन लिलाव करु नये अशी तात्पुरती मनाई ताकीद देण्यात येते.

३. उक्त अर्जाचा खर्च अंतीम निर्णयाच्यावेळी विचारात घेण्यात येईल.

NEHA K NAGARGOJE Digitally signed by NEHA K NAGARGOJE Date: 2024.04.03 16:38:53 +0530

( नेहा कों.नागरगोजे )

दि.०१/०४/२०२४ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

भोर, जि.पुणे

CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order

Name of the Steno – Smt. S.A.Sonawane
Court Name – Hon'ble Smt. N.K.Nagargoje
Date of Order/Judgment – 01/04/2024
Date of Sign Order/Judgment– 03/04/2024
Order uploaded on – 03/04/2024